# संसदेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलवा- राहुल

**नवी दिल्ली–** भारताच्या ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे. चार दिवस चाललेल्या लष्करी कारवाईत भारताने पाकिस्तानला गुडघ्यावर आणले आहे. देशातील प्रत्येक नागरिकाने सरकारच्या या लष्करी कारवाईचे कौतुक केले आहे. विरोधी पक्षांनीही मोदी सरकारला पूर्ण पाठिंबा दिला आहे. आता काँग्रेस नेते राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र लिहून पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि शस्त्रसंधी घोषणेवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलावण्याची मागणी केली आहे. जेणेकरून भारतीय लष्कराने पाकिस्तानला किती खोलवर जखम दिली आहे, हे देशातील जनतेला समजू शकेल.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे की विरोधी पक्षांनी एकमताने केलेल्या विनंतीचा मी पुनरुच्चार करतो की, संसदेचे विशेष अधिवेशन तातडीने बोलावण्यात यावे. पहलगाम दहशतवादी हल्ला, मऑपरेशन सिंदूरफ आणि आजच्या शस्त्रसंधीवर चर्चा करणे लोकांसाठी आणि त्यांच्या प्रतिनिधींसाठी खूप महत्त्वाचे आहे, शस्त्रसंधीची घोषणा सर्वप्रथम अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केली होती. येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येणं गरजेचं आहे. त्यामुळे तुम्ही आमच्या या मागणीचा गांभीर्याने आणि तत्परतेने विचार कराल. असं राहुल गांधी यांनी आपल्या पत्रात म्हटलं आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी २८ एप्रिलच्या आपल्या पत्राचा उल्लेख केला, ज्यात त्यांनी पंतप्रधान मोदींना पहलगाम दहशतवादी हल्ल्यावरील चर्चेसाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली होती. खर्गे यांनी आपल्या पत्रात लिहिले आहे, माननीय पंतप्रधानजी, कृपया लक्षात ठेवा की, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून मी तुम्हाला काय सांगितले होते. मी २८ एप्रिल रोजी लिहिलेल्या पत्राद्वारे पहलगाममध्ये झालेल्या अमानुष दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेच्या दोन्ही सभागृहांचे विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली होती. ताज्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यांनी तुम्हाला पुन्हा पत्र लिहून सर्व विरोधी पक्षांच्या एकमताने केलेल्या विनंतीची माहिती दिली आहे. त्यांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली आहे, ज्यात पहलगाम दहशतवाद, ऑपरेशन सिंदूर आणि वॉशिंग्टन डीसीमध्ये आणि नंतर भारत आणि पाकिस्तान सरकारांनी केलेल्या शस्त्रसंधी घोषणांवर चर्चा करण्याचा विषय आहे. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून मी या विनंतीच्या समर्थनार्थ पत्र लिहित आहे. मला विश्वास आहे की, यासाठी तुम्ही सहमत व्हाल.

राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी माध्यमांशी बोलताना संसदेचे विशेष अधिवेशन आणि सर्वपक्षीय बैठक बोलावण्याची विनंती केली. ते म्हणाले, आज आम्ही कोणतीही टीका करणार नाही. त्यांनी सर्व राजकीय पक्षांना आवाहन केले की, जोपर्यंत सरकार त्यांना हे आश्वासन देत नाही की, पंतप्रधानही बैठकीला उपस्थित राहतील, तोपर्यंत त्यांनी बैठकीत सहभागी होऊ नये. त्यामुळे आता विशेष अधिवेशना बाबत सरकार काय निर्णय घेतं याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नदीपात्रात पडलेला व्हॉलीबॉल काढण्याच्या प्रयत्नात पाथरे खुर्द येथील भावी युवा डॉक्टरचा गडचिरोलीत पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू

**राहुरी (प्रतिनिधी)–** राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द येथील पार्थ बाळासाहेब जाधव (वय-२०) या युवा भावी डॉक्टरचा झारखंड राज्यातील वैनगंगा नदी पात्रात पडलेला व्हॉलीबॉल काढण्याच्या प्रयत्नात पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. पाथरे परिसरावर शोककळा पसरली असून पार्थ जाधव याचा अंत्यविधी आज सोमवार दि. १२ मे रोजी सकाळी ६ वा पाथरे खुर्द येथील प्रवरा नदी तिरावर होत आहे.

राहुरी खुर्द येथील डॉ. बाळासाहेब पांडुरंग जाधव व डॉ. सौ. कल्पना बाळासाहेब जाधव यांचा एकुलता एक असलेला चि. पार्थ बाळासाहेब जाधव हा एम.बी.बी.एस. या वैद्यकीय पदवीच्या प्रथम वर्गात झारखंड राज्यातील गडचिरोली येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्गात शिकत होता. शनिवार दि. १० मे रोजी दुपारी या वैद्यकीय महाविद्यालयातील पार्थ जाधव सह गोपाल पाखरे, स्वप्नील शिंदे, पवन सत्कार, सुजीत देशमुख, शिवम जायभाये, सार्थक पाठक व जुनेद शेख हे आठजण वैणगंगा नदीच्या कोरड्या पात्रात व्हॉलीबॉल खेळत असताना जवळच असलेल्या पाण्याच्या प्रवाहात व्हॉलीबॉल पडला. तो काढण्यासाठी पार्थ हा गेला असता तो खोल पाण्यात बुडत असल्याचे लक्षात येताच त्याला वाचविण्यासाठी गोपाळ साखरे, स्वप्नील शिंदे व सुजीत देशमुख हे गेले, परंतु यातील केवळ सुजीत देशमुख यास पोहता येत



असल्याने तो एकटा बचावला व बुलढाणा जिल्ह्यातील भडगाव येथील गोपाळ साखरे (वय-२१), राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द येथील पार्थ बाळासाहेब जाधव (वय-२०) व छत्रपतीसंभाजीनगर जिल्ह्यातील रांजणगाव येथील स्वप्नील उदलसिंह शिंदे (वय- २०) या तीन युवा भावी डॉक्टरांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही दुर्घटना घडल्याचे समजताच स्थानिक पोलीस घटनास्थळी दाखल होऊन शोध मोहीम सुरू झाली. परंतु १० मे च्या रात्री अंधार पडेपर्यंत मृतदेह न सापडल्याने दुसऱ्या दिवशीच्या शोध मोहीमेत तिघा मृतकांचे मृतदेह आढळून आले. शवविच्छेदनानंतर मृतदेह मृतकांच्या गावी रवाना करण्यात आले असून यातील पार्थ जाधव यांचेवर सोमवार दि.१२ मे रोजी सकाळी ६ वा. पाथरे खुर्द येथील प्रवरा नदी तीरावर अंत्यसंस्कार होत आहे. चि. पार्थ यांचे पश्चात आई, वडील, एक बहीण, चुलते, चुलती व चुलत भाऊ, बहिणी असा परीवार आहे. पाथरे खुर्द येथील डॉ. बाळासाहेब जाधव, डॉ. कल्पना जाधव याचा तो एकुलता एक मुलगा व पुणे येथील वैद्यकीय सेवा देत असलेल्या डॉ. केतकी बाळासाहेब जाधव यांचा तो भाऊ होत. एकुलत्या एक युवा डॉक्टरच्या दुर्दैवी निधनाने परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# लाडक्या बहिणींसाठी ३० ते ४० हजारांचं अर्थसहाय्य होणार

**नांदेड –** अजित पवार यांच्या उपस्थितीत नांदेडमधील राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुखेड येथील चव्हाणवाडी येथे पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अजित पवार यांनी महाराष्ट्र सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात नवा प्रस्ताव असल्याची माहिती दिली. सरकार बँकांशी चर्चा करणार असून महिलांना उद्योगासाठी भांडवल ३० ते ४० हजार रुपयांचं भांडवल उपलब्ध करुन देण्याचा विचार आहे. लाडक्या बहिणींना दिले जाणार. १५०० रुपये बँकांकडे जमा होतील, असं अजित पवार म्हणाले.

अजित पवार इथं लाडक्या बहिणी बसल्यात मला त्यांना सांगायचं आहे, कधी कधी आमच्याबद्दल गैरसमज पसरवतात. लाडक्या बहिणींना दरमहिन्याला १५०० रुपये देतो. ज्या लाभार्थी महिला त्यात बसतात त्यांना योजना बंद करणार नाही. या योजनेतून लाडक्या बहिणींना मदत होते. आम्ही एक प्रस्ताव समोर आणलेला आहे, काही बँका पुढं आणलेल्या आहेत. नांदेड जिल्हा बँकेशी बोलणार आहे, असं अजित पवार म्हणाले.

काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका चांगल्या आहेत. आमचे दीड हजार रुपये त्या भगिनीला जातात, त्या ऐवजी भगिनीला त्यांनी ३० ते ४० हजार रुपये द्यायचे, हप्ता लाडकी बहीण मधून हप्ता जाईल. ४० हजार रुपयांचं भांडवल मिळालं तर बहीण काही तरी व्यवसाय करु शकले. त्याच्यातून तिचं कुटुंब ती उभं करु शकेल. हे होऊ शकतं, महाराष्ट्रात काही बहिणींनी हे केलं आहे. तुम्ही पण त्या गोष्टीचा विचार करा, असं अजित पवार म्हणाले. मी माझ्या कार्यकर्त्यांना, आमदारांना, माजी आमदारांना, पदाधिकाऱ्यांना सांगणार आहे ती योजना कशी आहे. आम्ही हा कार्यक्रम देणार आहे, त्याचा आपण फायदा घेतला पाहिजे, अशी विनंती असल्याचं अजित पवार म्हणाले.

भारताने पाकिस्तान विरुद्ध कणखर भूमिका घेतली पर्यटकांवर जो हल्ला झाला, त्यामुळे संपूर्ण भारतीय नागरिक देशात पेटून उठले. आपल्याला बदला घ्यायचा होता त्यावर सरकारने दहशतवादाला चोख प्रत्युत्तर देत ऑपरेशन सिंदूर राबवलं. पाक मधील दहशतवादी तळावर हल्ले करून ते नष्ट केले त्याबद्दल राज्यातील सर्व जनतेच्या वतीने स्वतः अजित पवार यांच्या वतीने देशातील सैनिकांचे व सरकारचे आभार मानले. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आता सहन केला जाणार नाही हे भारताने ऑपरेशन सिंदूर करून पुन्हा एकदा सिद्ध करून दाखवलं. आपण देशाच्या पलीकडे कारवाई करण्याची राजकीय इच्छाशक्ती दाखवून दिली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कणखर भूमिका घेत पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले.

# दुचाकी-कंटेनरचा अपघात; एक ठार, दुसरा जखमी

**कोपरगाव (तालुका प्रतिनिधी)–** शहरालगत असलेल्या नगर मनमाड महामार्गावरील राष्ट्रसंत सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज समाधी मंदिराजवळ रविवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास शिर्डीकडून येवल्याच्या दिशेने जाणाऱ्या एमएच ३८ क १०६१ या कंटेनरची एमएच १७ क १०४१ या स्प्लेंडर दुचाकीला धडक बसल्याने दुचाकीवरील हाफिज रफिक शाहा (वय अंदाजे ३४) राहणार येवला हे मयत झाले असून शिवाजी अर्जुन थोरात (वय अंदाजे ५३) हे जखमी झाले आहेत. जखमीवर एस. जे. एस. हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.



यावेळी महामार्गावर वाहतूक ठप्प झाली होती. या घटनेची माहिती शहर पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल वाय. के. सुंबे व महेश फड यांनी घटनास्थळी दाखल होत घटनेचा पंचनामा करत मयत हाफिज शाहा यांचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी कोपरगाव येथील ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. कंटेनर चालक आणि कंटेनर पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. पुढील तपास कोपरगाव शहर पोलिस करत आहे.

# राष्ट्रीय शिक्षण धोरण राज्यांवर बंधनकारक नाही; सुप्रीम

**नवी दिल्ली–** राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) देशातील कोणत्याही राज्यावर सक्तीने लागू करता येणार नाही, असा स्पष्ट निकाल सुप्रीम कोर्टाने दिला आहे. हिंदी शिकण्याची सक्ती करता येत नाही, हिंदी शिकायची असेल तर दिल्लीला या, असे स्पष्ट करत कोर्टाने यासंदर्भातील जनहित याचिका फेटाळून लावली.

तामिळनाडूसह अन्य राज्यांना अंमलबजावणीचे आदेश द्यावेत, अशी होती मागणी

तामिळनाडू आणि इतर काही राज्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. ही याचिका फेटाळताना न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने सांगितले की, अशा प्रकारचा मुद्दा रिट याचिकेद्वारे न घेता इतर योग्य सुनावणीत विचारात घेतला जाईल.

कोणत्याही राज्यावर जबरदस्तीने धोरण लागू करता येणार नाही. नागरिकांचे हक्क अबाधित राहतील याची आम्ही दक्षता घेऊ. जर राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे नागरिकांच्या अधिकारांना बाधा येत असेल, तर आम्ही त्यामध्ये हस्तक्षेप करू, असेही खंडपीठाने स्पष्ट केले.

तुम्ही मूळचे तामिळनाडूचे आहात आणि सध्या दिल्लीमध्ये राहता, मग तुम्ही तामिळनाडूवर शिक्षण धोरणाची सक्ती का करत आहात? असा प्रश्न कोर्टाने याचिकाकर्ते अ‍ॅड. जी. एस. मनी यांना विचारला. त्यांनी उत्तर दिले की, तामिळनाडूत हिंदी शिकवले जात नाही. त्यावर न्यायालयाने स्पष्ट केले की, तसे असेल तर हिंदी शिकायचे असल्यास दिल्लीमध्ये शिका आणि याचिकाकर्त्यांना फटकारले.

# भारताच्या पोरी जगात भारी! टीम इंडिया ‘चॅम्पियन’

## आधी मानधनाचा कहर, नंतर स्नेह राणाच्या फिरकीची जादू, श्रीलंकेला लोळवलं

**कोलंबो–** २०२५ मध्ये होणाऱ्या महिला वर्ल्ड कपपूर्वी भारताच्या पोरी जबरदस्त फॉर्ममध्ये दिसत आहेत. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने त्रिकोणी मालिकेच्या अंतिम सामन्यात श्रीलंकेचा ९७ धावांनी पराभव करून विजेतेपद पटकावले. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने ५० षटकांत ७ गडी गमावून ३४२ धावा केल्या. कोलंबोच्या मैदानावर स्मृती मानधनाने तिच्या धमाकेदार फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि १०१ चेंडूत ११६ धावांची शानदार खेळी खेळली. मानधनाने फलंदाजीने धुमाकूळ घातला, तर स्नेहा राणा आणि अमनजोत कौर यांची गोलंदाजीत जादू पाहायला **मिळाली.**




**श्रीलंकेचा संघ २४५ धावांवर ऑलआऊट...**

३४३ धावांच्या मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेच्या संघाची सुरुवात खूपच खराब झाली. हसिनी परेरा तिचे खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतली. पण, कर्णधार चामारी अटापट्टूने अर्धशतक झळकावले. स्नेहा राणाने तिला क्लीन बोल्ड करून आऊट केले. निलाक्षी डी सिल्वारने ४१ चेंडूत ४८ धावांची दमदार खेळी खेळली, पण तिला दुसऱ्या टोकाच्या इतर फलंदाजांकडून साथ मिळू शकली नाही आणि संपूर्ण संघ २४५ धावांवर ऑलआउट झाला. गोलंदाजीत, स्नेहा राणाने ९.२ षटकांच्या स्पेलमध्ये फक्त ३८ धावा देत ४ विकेट तर अमनजोत कौरने ३ विकेट्स घेतल्या.

**स्मृती मानधनाने रचला विजयाचा पाया...**

विजेतेपदाच्या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रतीका रावल आणि स्मृती मानधना यांनी कर्णधाराचा निर्णय पूर्णपणे बरोबर असल्याचे सिद्ध केले. पहिल्या विकेटसाठी १४.५ षटकांत ७० धावा केल्या. प्रतीकाने ४९ चेंडूत ३६ धावा केल्या. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येत असताना, हरलीन देओलने ४७ धावा केल्या आणि मानधनासोबत दुसऱ्या विकेटसाठी शंभर धावांची भागीदारी केली. मानधनाने १०१ चेंडूंचा सामना करत ११६ धावांची शानदार खेळी खेळली. या खेळीदरम्यान स्मृतीने १५ चौकार आणि दोन षटकार मारले. कर्णधार हरमनप्रीत कौरने ३० चेंडूत ४१ धावा केल्या तर जेमिमा रॉड्रिग्जने २९ चेंडूत ४४ धावा केल्या. दीप्ती शर्माने शेवटच्या षटकांमध्ये १४ चेंडूत नाबाद २० धावा करत संघाला एकूण ३४२ धावांपर्यंत पोहोचवले.

# आता सीए परीक्षा १६ ते २४ मे दरम्यान

**मुंबई–** इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया ने अखेर सीए परीक्षेच्या सुधारित तारखा जाहीर केल्या आहेत. देशभरातील हजारो विद्यार्थी या परीक्षेची आतुरतेने वाट पाहत होते. इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया कडून जारी करण्यात आलेल्या नव्या वेळापत्रकानुसार आता सीएची परीक्षा १६ मे ते २४ मे २०२५ या कालावधीत घेतली जाणार आहे. याआधी ही परीक्षा एप्रिल महिन्यात होणार असल्याचे अपेक्षित होते, मात्र काही कारणास्तव वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

सीए म्हणजेच चार्टर्ड अकाउंटंट होण्यासाठी विद्यार्थ्यांना इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया मार्फत घेण्यात येणाऱ्या विविध टप्प्यांच्या परीक्षा द्याव्या लागतात. यामध्ये फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल अशा तीन स्तरांवर परीक्षा घेतली जाते. या सर्व परीक्षा एकाच वेळी देशभरातील विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येतात. वेळापत्रकातील बदलामुळे काही विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे, तर काहींना तयारीचे नियोजन पुन्हा करावे लागत आहे.जारी करण्यात आलेल्या अधिकृत निवेदनानुसार, परीक्षांच्या तारखांमध्ये बदल हा विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आणि काही तांत्रिक कारणांमुळे करण्यात आला आहे. नव्या वेळापत्रकानुसार फाउंडेशन कोर्सच्या परीक्षा २० मे ते २४ मे दरम्यान होतील, तर इंटरमिजिएट आणि फायनल परीक्षा १६ मे पासून सुरू होणार आहेत. प्रत्येक परीक्षेसाठी वेगवेगळे वेळापत्रक संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकचे ४० जवान-अधिकारी मारले

जनरल राजीव घई यांनी सुरुवातीला माहिती दिली. आम्ही अनेक दहशतवाद्यांची ठिकाणे ओळखले होते. पण अनेक दहशतवाद्यांनी भारताकडून कारवाई होईल या भीतीने आपली तळे रिकामे केली होती. भारताने विचारपूर्वक टार्गेट ठरवले होते. लष्कराने दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय लष्कराने पाकिस्तानमधील ९ दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केली. या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. यामध्ये हायवॅल्यू टार्गेट देखील होते. आम्ही तीन प्रमुख दहशतवाद्यांचा खात्मा केला आहे. यामध्ये मुदस्सर खास, हाफिज जमील आणि युसूफ अझहर यांचा समावेश आहे, जे अपहरणात आणि पुलवामा बॉम्बस्फोटात सहभागी होते, अशी माहिती राजीव घई यांनी दिली. यावेळी त्यांनी कारवाईचे फोटो देखील दाखवले.

दहशतवाद विरोधाच्या कारवाईनंतर लगेच पाकिस्तानाकडून नियंत्रण रेषेचं उल्लंघन करण्यात आलं. शत्रूची अनिश्चित आणि घाबरलेली प्रतिक्रिया ही नंतर लगेच बघायला मिळाली. पाकिस्तानच्या लष्कराने भारतीय नागरिकांना, गावं, गुरुद्वार सारख्या धार्मिक स्थळांना लक्ष्य केलं. यामुळे अनेक नागरिकांचा दुखद मृत्यू झाला. भारतीय हवाई दलाने या विरोधात कारवाई करत त्यांच्या अनेक छावणी उद्ध्वस्त केल्या. त्यानंतर लवकरच पाकिस्तानने नियंत्रण रेषेचेही उल्लंघन केले आणि आपल्या शत्रूची अनियमित आणि घाबरलेली प्रतिक्रिया दुर्दैवाने त्यांच्या हल्ल्याला बळी पडलेल्या नागरिकांच्या संख्येवरून, लोकवस्ती असलेल्या गावांमधून आणि गुरुद्वारांसारखी धार्मिक स्थळांवरून स्पष्ट झाली, ज्यामुळे अनेक लोकांचा दुःखद मृत्यू झाला. भारतीय हवाई दलाने पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं, अशी माहिती लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी दिली.

**बहावलपूरमध्ये दहशतवादी तळ उद्ध्वस्त**

डीजी एअर ऑपरेशन्स एअर मार्शल ए.के. भारती यांनीदेखील यावेळी माहिती दिली. दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेल्या हवाई हल्ल्यात एअर टू सर्फेस गायडेड ॲम्युनिशनचा वापर करण्यात आला, जेणेकरुन कोलेटरल डॅमेज होऊ नये. हवाई दलाने मुरीदके आणि बहावलपूर येथील दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण शिबिरांना अचूक लक्ष्य केले. यामुळे एअर स्ट्राईकचा उद्देश साध्य झाला. बहावलपूरमध्ये हाय व्हॅल्यू टार्गेट होते. आम्ही अचूक हल्ला केला, असं एअर मार्शल ए.के. भारती यांनी सांगितलं.

**पाकिस्तानने अनेकवेळा ड्रोन हल्ले केले**

एअर मार्शल ए. के. भारती यांनीदेखील यावेळी माहिती दिली. पाकिस्तानकडून ८ आणि ९ मे च्या रात्री वेगवेगळ्या वेबमध्ये मोठ्या संख्येने ड्रोन आले. आमची एअर डिफेन्स सिस्टीम पूर्णपणे सज्ज होती. ७ आणि ८ तारखेच्या रात्रीतील फरक असा होता की, ७ मे रोजी जास्त ड्रोन होते पण ८ तारखेला जास्त क्वाडकॉप्टर देखील होते. हे हेरगिरी करण्यासाठी आणि नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी असू शकतात. प्रत्युत्तरादाखल, आम्ही पुन्हा एकदा पाकिस्तानी लष्करी तळांना लक्ष्य केले. त्यानंतर, ९-१० मे च्या रात्री, पाकिस्तानने सीमेपलीकडून आमच्या हवाई क्षेत्रात ड्रोन आणि विमाने उडवली आणि अनेक लष्करी पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याचे मोठ्या प्रमाणात अयशस्वी प्रयत्न केले, अशी माहिती एअर मार्शल ए. के. भारती यांनी दिली.

आम्ही संपूर्ण सीमेवरील पाकिस्तानचे एअरबेस, कमांड सेंटर, एअर डिफेन्स सिस्टीमवर लक्ष्य केले. त्यांच्या प्रत्येक तळाला, प्रत्येक यंत्रणेला लक्ष्य करण्याची क्षमता आपल्याकडे आहे. त्यांना सुद्धबुद्धी यावी म्हणून आम्ही एक संतुलित एअर स्ट्राईक केला, असंदेखील एअर मार्शल ए. के. भारती यांनी सांगितलं.

**पहलगाम हल्ल्यानंतर नौदलही सतर्क होते**

डीजी एनओ व्हाइस ॲडमिरल ए ए प्रमोद यांनीदेखील यावेळी प्रतिक्रिया दिली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर नौदलाने तयारी केली होती. आमच्या ऑपरेशनल तयारीसाठी आम्ही समुद्रात चाचण्या देखील घेतल्या. नौदलाने पाकिस्तानी नौदलाला बचावात्मक स्थितीत राहण्यास भाग पाडले. ते संपूर्ण वेळ त्याच्या बंदरातच राहिले, असं त्यांनी सांगितलं.

**पाकिस्तानचे ३५-४० सैनिक मारले गेले**

ऑपरेशन सिंदूरचे उद्दीष्ट स्पष्ट होते, असं लेफ्टनंट जनरल राजीव घई म्हणाले. दहशतवाद्यांना आणि त्यांच्या योजनाकारांना शिक्षा करणे आणि त्यांचे दहशतवादी नेटवर्क नष्ट करणे हे उद्दीष्ट होते. पाकिस्तानकडून आमच्या हवाई क्षेत्राला लक्ष्य करण्याचा प्रयत्न झाला. पण ते अयशस्वी झाले. आम्ही मजबुतीने सामना केला. तोफखान्याच्या गोळीबारात पाकिस्तानचे ३५-४० सैनिक मृत्युमुखी पडले, अशीदेखील माहिती लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी दिली.

## भंडारदरात पुन्हा अवकाळी पावसाची वादळी बॅटिंग

पाणी सोडण्यात येत आहे. निळवंडे धरणात सध्या १७५८ दलघफू (२१.११टक्के) पाणीसाठा आहे. या धरणातून कालव्यांमधून आवर्तन सुरू आहे.

दरम्यान, आढळा धरणातील पाणीसाठाही समाधानकारक आहे. या धरणात सध्या ५०० दलघफू (४७.१७ टक्के) पाणीसाठा आहे. वाकी तलावात ५२.९० दलघफू (४६.९५टक्के) पाणीसाठा आहे. यंदा धरणात समाधानकारक पाणी असून मान्सूनच्या लवकर आगमनाची शक्यता आहे.

## इंस्टाग्रामवरील मेसेज ठरला जीवघेणा राहात्याच्या तरुणाची कोपरगावात हत्या

महेश गोरक्षनाथ काकड (वय-२६ वर्षे) याने दिलेल्या फिर्यादीवरून कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात वरील आरोपिंविरुद्ध गुन्हा रजि.व.कलम २५१/२०२५ कलम १०३(१), १४०(१), १८९(२),१९१(२) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने,पो.नि. भगवान मथुरे, स.पो.नि.किशोर पवार,पोसई दीपक रोठे, पोसई भुषण हंडोरे आदींनी भेट दिली. पुढील तपास पोलीस निरीक्षक भगवान मथुरे करत आहे.

## जिल्हा नियोजनमधून अहिल्यानगर, शिर्डीत स्पर्धा परीक्षा अभ्यासिका

काळात जिल्ह्यातून मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षेत विद्यार्थी यश मिळवत आहेत. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी आणखी वाव मिळावा, यासाठी शिर्डी आणि नगर या ठिकाणी मुले आणि मुलींसाठी स्वतंत्र अभ्यासिका तयार करण्यात येणार आहे. या ठिकाणी अद्यावत वाचनालय उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मानवी आरोग्यासाठी घातक असलेल्या गुटखा विक्रेत्यांवर, तसेच पनीर निर्मितीमध्ये भेसळ करणाऱ्यांची अन्न व औषध विभागामार्फत तपासणी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधून पाण्याचे सुयोग्य नियोजन करण्यात आले असून पाणी टंचाईच्या प्रश्नावर गांभीर्याने काम करावे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० व्या जयंतीनिमित्त चौंडीसाठी कुकडी आवर्तनातून पुरेशा प्रमाणात पाणी सोडण्यात येणार आहे. ३१ मेपर्यंत चौंडी येथील तलाव पूर्णपणे भरलेले असतील. आषाढी वारीसाठी जिल्ह्यातून २२१ पालख्या जातात.या पालखांच्या नियोजनाबाबत जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू करावी. यासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येणार असून संत निवृतीनाथ महाराजांच्या पालखीचे आगमन जिल्ह्यात संगमनेर तालुक्यात प्रथम होते. त्यामुळे या पालखीच्या नियोजनाबबात विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी अधिकऱ्यांना दिले.

गाळ मुक्त तलाव आणि गाळ युक्त शिवार योजनेत जिल्ह्यात अनेक ठिकाणी कामे सुरू असून पारनेर तालुक्यातून या योजनेबाबत तक्रारी आल्या असून त्याअनुषंघाने चौकशी सुरू करण्यात आली आहे.

**गाडीच्या काळ्या काचांवर कारवाई**

चार चाकी वाहनाच्या काळ्या काचांवर पोलिसांनी कडक करावाई करावी, अशी सूचना प्रशासनास देणार आहे. मुख्यमंत्री यांनी नगरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची घोषणा केली असून मेडिकल काउन्सिलच्या तरतुदीनुसार महाविद्यालयाचे काम सुरू होणार आहे. याबाबत अंतिम निर्णय काउन्सिलच घेणार असल्याचे पालकमंत्री विखे म्हणाले.

## दोघा शाळकरी मुलांचा शेततळ्यात बुडून मृत्यू

त्यांनी आरडाओरडा केला. तो आवाज मिरची तोडणीचे काम करत असलेल्या महिलांना गेला. महिलांनी मुले शेततळ्यात बुडत असल्याचे पाहून आरडाओरडा केला. मात्र, मदतीला इतर लोक येईपर्यंत दोन्ही मुले पाण्यात बुडाली. शेततळे ४० फूट खोल असल्याने इतर पोहणाऱ्या लोकांनाही त्या मुलांना बाहेर काढता आले नाही.अखेर शेवटी जेसीबीच्या साहाय्याने शेततळे फोडून मुलांना बाहेर काढण्यात आले. त्यांना नेवासा फाटा येथील शासकीय रुग्णालयात आणले. तोपर्यंत दोघांचाही मृत्यू झाला होता. नेवासा फाटा येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर गेवराई येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.